REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 4 | JANUARY - 2019

# बालकामगार विषयक समस्या व कायदे

प्रा.डॉ.शेंडे डी.डी.
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
रा. ब. ना. बोरावके महाविदयालय, श्रीरामपूर.

## १. गोषवारा :-

जागतिकीकरणमुळे मानवी जीवनावर मोठा परिणाम झाला आहे. राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतीक क्षेत्रात झापाटयाने बदल होत आहे. दुसऱ्या महायुध्दानंतर मानवाने भौतिक प्रगतीच्या कक्षा काही कालावधीत ओलाडंल्या आहेत. परंतु भौतिक सुखाच्या मागे जात असतांना मानव-मानवापासून कधी व किती दुर गेला याची कल्पनाच आली नाही. आणि याच भौतिक बदलामुळे मानवापुढे काही समस्याही निर्माण झाल्या आहेत. उदा. दारिद्रय, कुपोषन, स्त्रियांचे अधिकार, दहशतवाद, पर्यावरणीय समस्या, आरोग्याचे प्रश्न या सर्व संघर्षामध्ये स्त्रिया व बालकांचे मानवी हक्क डावलले जात आहे. दारिद्रयाच्या मुख्य कारणामुळे बालके त्यांच्या नैसर्गिक जीवन जगण्याच्या हक्कापासून दुर जात आहेत.भारतात तर बालकांच्या दारिद्रयाच्या प्रश्न गंभीर बनलेला असून या बालकांकडून कधी-कधी गंभीर गुन्हेही घडतात, याच घटकाचा आढावा प्रस्तुत शोधनिबंधात केला आहे.

## २. प्रस्तावना :-

बालकामगार याचे मुळ कारण दारिद्रयात असल्याचे दिसून येते. सामाजिकदृष्टया वंचित व गरिब कुटुबातील मुले बालमजुरी कडे जोडली जातात. ज्या-ज्या कुटुंबातील व्यक्तींचे उत्पन्न कमी आहे अशा कुटुंबातील पालकांची अशी अपेक्षा असते की, आपल्या मुलांनी शाळेत जाण्याऐवजी आर्थिक उत्पन्नाचा स्त्रोत शोधावा किंबहुना घरात दररोज काही प्रमाणात का होईना पैसे आणावेत. त्याच बरोबर सध्या बाल मजुरास बाजारात मोठी मागणी आहे. कारण बालमजुराकडून कमी मोबदल्यात जास्त श्रम करून घेता येतात. त्यातून व्यावसायिकांना अधिक नफा शिल्लक राहतो. सामान्य उत्पादकतेवर मालकांचे समाधान होत नाही. त्यामुळे मालक वर्ग बालमजुराकडून जादा काम करून घेतात. उदा. तामिळनाडु राज्यात काही जिल्हयामध्ये आग पेटया बनविण्याचे बहुतांशी काम बालमजुरांकडून केले जाते. परंतु या क्षेत्रातील बालमजूर काढून घेतले तर या व्यवसायात काम करणाऱ्या मजुरांना अधिक मोबदला दयावा लागेल त्यामुळे उत्पादन खर्चात वाढ होईल. महाराष्ट्रातही अनेक हॉटेल व छोटया व्यवसायामध्ये बालमजूर कमी मोबदल्यात काम करतांना दिसून येतात. अशा प्रकारच्या अनेक समस्या बालकामगाराच्या बाबातीत निर्माण झालेल्या आहेत.



## ३. अभ्यास विषयाची उदिष्टये :-

१) बालकामगारांच्या समस्यांचा अभ्यास करणे.
२) त्यांच्या सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करणे
३) बालकामगार पध्दती बंद व्हावी यासाठी सरकारने योजलेल्या उपाय योजनाचा अभ्यास करणे.

## ४. अभ्यास पध्दती :-

भारतासह जगातील विविध देशांमध्ये बालकामगार, बालकांचे गुन्हेगारीकरण, बालकांचे हक्क, या बाबतीत वेळोवेळी चर्चा होतांना दिसते. बालकामगार कोणत्या परिस्थितीतून निर्माण होतात, त्यांची सामाजिक परिस्थिती, त्यासाठी कोण जाबाबदार आहेत, याचा अभ्यास प्रस्तुत शोधनिबंधामध्ये केलेला आहे. तसेच जगातील बालकामगार चळवळ थांबवावी, बालकांना त्यांचे हक्क मिळावे त्यांच्यासाठी शैक्षणिक सुविधा निर्माण करून दयाव्यात यासाठी सयुंक्त राष्ट्र संघटनेने वेळोवेळी बालकांच्या समस्या सोडविण्यासाठी आवाहन केले. काही राष्ट्रानी त्यास प्रतिसाद दिला तर काही राष्ट्रांनी बालकांच्या समस्यांकडे दुर्लक्ष केले.

स्वातंत्र्य प्राप्तीपासूनच भारताने बालकांच्या हक्कांच्या दृष्टीने प्रयत्न सुरू केले होते भारताच्या राज्यघटनेने विविध कलमाच्या माध्यमातून बालकांचे हक्क निश्चित केले आहेत. तरीही भारतातील बालकामगार प्रथा बंद होताना दिसत नाही. तसेच बालगुन्हेगारीचे प्रमाणही वाढत असल्याचे दिसते. या समस्या दुर करण्यासाठी केंद्र व महाराष्ट्र राज्यशासनाने वेळोवेळी वेगवेगळया प्रकारचे कायदे करून त्यावर प्रतिबंध घालण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचा अभ्यास प्रस्तुत शोधनिबंधामध्ये केलेला आहे.

### • बालकामगार संकल्पनेचा अर्थ :-

बालक या संकल्पनेबाबत विविध यंत्रणामध्ये मतभिन्नता आढळून येते. या विषयाच्या अभ्यासासाठी शासनाने १९७९ मध्ये एम.एस.गुरूप्रसाद स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. या समितीने बालकाचे कार्य आणि हक्क या दोन्ही घटकातील भेद स्पष्ट केला. समितीने पुढील प्रमाणे मत मांडले.

१. बालकामगाराच्या समस्येबाबत उपाययोजना करण्यात यावी बालकामगार म्हणजे बालकांच्या कुवतीपेक्षा त्यांना अधिक काम करावे लागते. अल्पवयात केलेल्या कामामुळे त्यांच्या शिक्षणात बाधा निर्माण होवून त्यांच्या आरोग्याच्या बाबातीत समस्या निर्माण होतात. त्यामुळे त्यांच्या जीवीताला धोका निर्माण होतो.

### • युनिसेफच्या दृष्टीकोनातून :-

बालकामगार म्हणजे ५ ते ११ या वयोगटातील स्त्री-पुरूष बालकाने किमान १ तास आर्थिक क्रिंया वा आठवडयामध्ये किमान २८ तास कौटुंबिक काम करणे तर १२ ते १४ वयोगटातील बालकाने किमान १४ तास आर्थिक क्रिंया किंवा किमान ४२ तास कौटुंबिक काम करणे होय.

### • भारतीय जनगणना कार्यालय २००१ :-

"बालकामगार म्हणजे १७ वर्षाच्या आतील बालकांनी मोबदला, वेतन व नफ्यासह किंवा या बाबती शिवाय कोणत्याही आर्थिक दृष्टया उत्पादक कार्यामध्ये सहभागी असणे होय." अशा प्रकारचा सहभाग हा शारिरीक, मानसिक, किंवा इतर कोणत्याही स्वरूपाचा असो. तसेच अर्धवेळ काम किंवा विना मोबदला शेतात, कुटुंबात, व्यापारात किंवा इतर कोणत्याही व्यवसाय-उत्पादन करण्याच्या कामाचा समावेश असू शकते.

### • प्रकार :-

भारत सरकारने विविध समित्यांच्या शिफारशीवरून बालकामगाराचे दोन गटात वर्गीकरण केले आहे.

१) मुख्य कामगार :- जो बालक वर्षातून किमान ६ महिने किंवा त्या पेक्षा अधिक काळ काम करतो त्यास मुख्य बालकामगार असे म्हणतात.

२) सीमांत कामगार :- जे बालक वर्षातून किमान सहा महिने पेक्षा कमी काळ काम करतात त्यांना सीमांत बालकामगार असे म्हणतात.

**बालकामगाराचे वर्गीकरण :-**

**१. बालकामगार :-**

विविध कंपन्या, कार्यशाळा, अस्थापना विभाग, विविध प्रकारच्या सेवा क्षेत्रात मोबदला घेवून किंवा विना मोबदला काम करणारी बालकांचा समावेश बालकामगार या वर्गामध्ये होतो.

**२. दास्यातील बालके :-**

पैशाकरिता पालक अनेक वेळेस आपल्या बालकांना गहाण टाकतात. हि बालके आपल्या वडीलांची कर्जे वारसा हक्काने फेडण्यासाठी विनामोबदला काम करतात त्यास दास्य बालके असे म्हणतात. भारतातील काही दुर्बल मागासलेल्या घटक राज्यामध्ये ही प्रथा आहे ही प्रथा खुपच गंभीर असून अशा पध्दतीने काम करणाऱ्या बालकापर्यंत पोहचणे प्रशासनाच्या दृष्टीने अवघड बाब आहे.

**३. घरकाम/कौटुबिंक कामे करणारी बालके :-**

आर्थिक मोबदला घेवून अथवा न घेता केवळ अन्न मिळण्यासाठी बालके कुटुंबामध्ये काम करतात त्यांना घरकाम करणारी बालके असे म्हणतात. उदा. अनेक शहरामध्ये अशा प्रकारची बालके एखादया मजुराप्रमाणे वर्षानुवर्षे कुटुंबामध्ये काम करतात. त्यांच्या कामाचे स्वरूपही वेगवेगळे असते.

**४. फुटपाथवरील बालके :-**

या प्रकारातील बालके रस्त्यावर श्रम करून (बुट पॉलिश करून, वर्तमान पत्रे विकून, भंगार गोळा करणे) त्याच प्रमाणे भिक मागून रस्त्याच्या कडेला राहतात. त्यांना निवाऱ्याची कोणतीही सोय नसते. या प्रकारातील बालके गंभीर स्वरूपाच्या गुन्हयामध्ये सापडतात. कारण पैश्यासाठी हि बालगुन्हेगार झाल्याची अनेक उदा. सापडतात.

**५. स्थलांतरीत बालके :-**

उपजिविकेच्या शोधार्थ अनेक कुटुंबे एका शहरातून दुसऱ्या शहरात, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी फिरत राहतात. त्यांच्या बरोबर, त्यांच्या बालका नाही फिरावे लागते. त्यामुळे या बालकांच्या शिक्षणावर परिणाम होतो. स्थलांतरीत बालके वेगवेगळया प्रकारची मिळतील ती कामे करून उपजिविका चालवतात. अशा प्रकारच्या बालमजुरीच्या माध्यमातून बालके गुन्हेगारीकडे वळतात बालमजुरीच्या माध्यमातून अनेक बालके सामाजिक, कौटुबिंक संस्कारापासुन दुर राहिल्यामुळे त्यातील काही बालके व्यसनाधिनतेकडे वळताना दिसतात. त्यामुळे व्यसनासाठी आपल्या आर्थिक गरजा पुर्ण होण्यासाठी बालके गुन्हेगारी कडे वळतात. त्यांना बालगुन्हेगार म्हणतात. उदा. लहान-लहान चोऱ्या करणे, मोठया दरोडयामध्ये सहभागी होणे, खून करणे, अशा प्रकारचे वर्तनही बालगुन्हेगारांकडून होते. ज्या प्रमाणात बालमजुरीत वाढ होत जाते त्याच प्रमाणात बालगुन्हेगारीच्या प्रमाणात वाढ होताना दिसून येते.

भारतात बालमजुरी आटोक्यात आणण्यासाठी तिचे प्रमाण कमी करण्यासाठी शासन स्तरावर विविध प्रकारचे प्रयत्न केले जात आहे.

- **बालकासाठीचे युनोचे कायदे :-**

२० नोव्हेंबर १९८९ रोजी सयुंक्त राष्ट्रसंघाच्या झालेल्या सर्वसाधारण सभेत जगातील सर्व बालकांना त्यांच्या अधिकांरांची हमी देणारा एक महत्वाचा करार मंजूर केला त्या करारास जगभरातील सुमारे ६० राष्ट्रानी मान्यता दिली असून तो करार आता आंतरराष्ट्रीय कायदा बनला आहे. हा कायदा मानवधिकार चळवळीत एक महत्वाचा टप्पा मानला जातो. या कायदयाद्वारे जगातील कोणत्याही बालकास कुठल्याही प्रकारच्या भेदभावाशिवाय जगण्याचा अधिकार प्राप्त झाला असून त्यास आचार, विचार व धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार दिला आहे.

- **भारत सरकारचे कायदे :-**
- **घटनात्मक तरतुदी :-**

१) कलम १५(३) :- राज्य शासन महिला व बालकासाठी विशेष तरतूदी करू शकते.
२) कलम २१(अ) :- ६ ते १४ वयोगटातील मुलांना राज्याने मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण दयावे.
३) कलम २३ :- मानवाचा व्यापार वेठबिगारी प्रतिबंध.
४) कलम २४ :- धोकादायक कारखाने, खाणी अथवा धोकादायक व्यवसायात १४ वर्षाखालील बालकांना प्रतिबंध.
५) कलम ३६ ई :- बालकांच्या आरोग्याला धोका पोहचेल असे काम न देणे.
६) कलम ३६ फ :- बालकांना निकोच मुक्त व प्रतिष्ठेच्या वातावरणात विकसित होण्यास संधी देणे.
७) कलम ४५ :- ६ वर्षापर्यंतच्या सर्व बालकांना प्राथमिक बालसंगोपन व शिक्षणाची सुविधा देणे.

- **कायदेशिर हक्क :-**

१. बालविवाह प्रतिबंध कायदा - १६२६
२. बालकामगार (प्रतिबंध व नियत्रंण) कायदा - १६८६
३. अर्भक पर्यायी दुध, दुध बाटली आणि अर्भक खादयपदार्थ अधिनियम - १६६२
४. युवकांना धोकादायक ठरणाऱ्या प्रकाशनावर बंदी - १६५६
५. दुर्लक्षित वा उपेक्षित बालकांचे संगोपन, संरक्षण, सांभाळ, कल्याण, प्रशिक्षण, शिक्षण, व पुनर्वसन करणे अधिनियम - १६६०
६. मुली व महिला यांचे व्यापारी दृष्टया लैगिंक शोषण प्रतिबंध अधिनियम - १६५६
७. बालकांना मोफत विधिसेवा पुरविणे, अधिनियम १६८७.

२०१२ मध्ये संसदेने बालकामगार (प्रतिबंध नियमन) अधिनियमन १६८६ या कायदयात दुरूस्ती करून १४ वर्षापर्यंतच्या बालकांना धोकादायक अथवा धोका नसलेल्या ठिकाणी काम करण्यास प्रतिबंध केला आहे.

बालकामगारावरील अन्याय दुर व्हावा, किमान त्यांच्या समस्या सुटाव्यात, वर्षातुन किमान एक दिवस तरी बालकामगाराकडे जगाचे लक्ष जावे म्हणून '१० जून' हा बालकामगार विरोधी दिन म्हणून जागतिक पातळीवर साजरा केला जातो.

अशा प्रकारे संपूर्ण जगात व भारतात बालकामगार त्यांच्या समस्या त्यांचे स्वरूप व जागतिक समुदायाने व भारत सरकारने वेळोवेळी आवश्यक ते कायदे करून बालकामगार प्रथा बंद करण्याचा, त्यावर प्रतिबंध घालण्याचा प्रयत्न केला आहे. तरीही जगातील व भारतातील बालकामगार प्रथा व बालकांच्या समस्या सोडविण्यात जागतिक समुदायाला संपुर्ण यश प्राप्त झालेले नाही.

**संदर्भ :-**

१. तुकाराम जाधव - मानवी हक्क
२. पाटील व्ही.बी - मानवी हक्क
३. वाघमारे बी.एस - मानव संसाधन विकास व मानवाधिकार
४. देशपांडे आर.वाय - भारतातील बालकावर कायदयाच्या तरतूदी
५. डॉ सुभाष गवळी - ओळख मानवाधिकाराची